MHOS130009992023

**<u>कौ.हि.म.सं.अर्ज क्र.१५/२०२३</u>**
सोनाली जाधव/रविंद्र जाधव व इतर

## <u>आदेश नि.क्र.०२ वर</u>

अर्जदार हिने प्रस्तुतचा अर्ज हा कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण कायदा २००५ चे कलम २३ प्रमाणे अंतरिम पोटगी मिळण्याकरीता दाखल केला आहे.

**०२.** अर्जदाराचे कथन आहे की, अर्जदार व गैरअर्जदार क्र.१ यांचा विवाह दिनांक ०९.१२.२०२० रोजी भूम येथे हिंदु धर्म शास्त्राप्रमाणे झाला. गैरअर्जदार क्र.२ ते ७ हे अर्जदाराच्या सासरचे नातेवाईक आहेत. अर्जदार व गैरअर्जदार क्र.१ यांचे नाते अद्याप अस्तित्वात आहे. लग्नानंतर अर्जदार गैरअर्जदार क्र.१ यांच्या घरी नांदावयास गेल्यापासूनच गैरअर्जदारांनी तिला त्रास देण्यास सुरुवात केली. गैरअर्जदार क्र.१ हा अर्जदारास पुणे येथे जागा खरेदी करण्यासाठी अर्जदाराकडे ५,००,०००/– रुपयेची मागणी करुन मारहाण करत असे. तसेच अर्जदारास जेवण न देणे, कपडेलत्ते न देणे, करणीधरणीसाठी सतत त्रास देणे, चारित्र्यावर संशय घेणे, इत्यादी प्रकारचा शारिरिक व मानसिक त्रास सहन करत असे. परंतु, अर्जदार ही सदरचा त्रास सहन करत गैरअर्जदार क्र.१ सोबत नांदत होती. दिनांक ०२.०१.२०२३ रोजी अर्जदाराने गैरअर्जदार क्र.१ कडे त्याच्या विवाह बाहयसंबंधीची चौकशी केल्याने गैरअर्जदार क्र.१ ने तिला जिवघेणी मारहाण केली व दिनांक १०.०१.२०२३ रोजी 'तु मला लागत नाही, तु माझी बायको

नाही, येथुन पुढे तू माझ्याकडे यावयाचे नाही, मी तुला सांभाळणार नाही' असे म्हणून अर्जदारास तिचे माहेरी मौजे भूम, ता. भूम येथे सोडून निघुन गेला. त्यानंतर अर्जदार व तिचे नातेवाईकांनी गैरअर्जदाराकडे अर्जदारास सांभाळण्यासाठी वारंवार विनंत्या केल्या परंतु, गैरअर्जदार क्र.१ यास दुसरे लग्न करण्याची इच्छा असल्याने त्यांनी त्यास नकार दिला. तेव्हापासून अर्जदार ही तिच्या माहेरी मौजे भूम येथे राहत आहे.

**०३.** अर्जदाराकडे उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. तसेच अर्जदारास मोल मजुरीचे किंवा कलाकुसरीचे काम येत नाही. याउलट गैरअर्जदार क्र.१ हा पूर्वी पुणे येथे विप्रो कंपनीत ॲडमिनिस्ट्रेटर म्हणून नोकरीस होता व तेथे त्याला रुपये ३०,०००/– इतका पगार होता. सध्या गैरअर्जदार क्र.१ हा आय.टी. कंपनीमध्ये नोकरीस असुन त्यास दरमहा रुपये ५०,०००/– पगार मिळतो. तसेच गैरअर्जदार क्र.२ चे नावे धनेगांव, ता. जामखेड, जि. अहमदनगर येथे गट नंब.५५, ६०, ६१, ९७ व ९९ मध्ये एकुण ०८ हे. ०३ आर जमीन असुन सदर जमीनीतून दरवर्षी १५,००,०००/– ते ५०,००,०००/– रुपयांचे उत्पन्न मिळते. गैरअर्जदाराला चिखली पुणे येथे २ गुंठे जागेत २ मजली इमारत असुन त्यातून दरमहा रु.१५,०००/– इतके भाडे मिळते. त्यामुळे अर्जदाराने गैरअर्जदाराकडे रक्कम रुपये १५,०००/– इतक्या अंतरिम पोटगीची मागणी केलेली आहे.

**०४.** गैरअर्जदार यांनी निशानी १३ कडे लेखी म्हणणे सादर करुन गैरअर्जदारांनी, अर्जदार व गैरअर्जदार क्र.१ यांच्यातील नातेसंबंध वगळता अर्जदाराने केलेल्या आरोपांचा इन्कार केलेला आहे. गैरअर्जदारांच्या मते, अर्जदार ही भूम येथील खाजगी इंग्लीश शाळेमध्ये शिक्षिका म्हणून नोकरीस आहे व तिला दरमहा ३०,०००/– रुपये इतका पगार मिळतो. याउलट गैरअर्जदार क्र.१ हा थरमॅल्स आय.टी. कंपनी भोसरी पुणे येथे खाजगी काम करीत आहे. तसेच गैरअर्जदाराने त्याचे कोणाबरोबरही विवाहबाहय

संबंध नसल्याचे कथन केले आहे. प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराने गैरअर्जदारांस मानसिक व शारिरिक त्रास होण्यासाठी दाखल केलेला आहे. गैरअर्जदार यांनी अर्जदाराने केलेले शारिरिक, मानसिक व आर्थिक छळाचे आरोप स्पष्टपणे नाकारलेले आहेत. शेवटी गैरअर्जदाराने अर्जदाराचा अर्ज नामंजुर करण्याची मागणी केली आहे.

**०५.** दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. दोन्ही पक्षाच्या वकीलांनी युक्तीवादादरम्यान अर्जातील कथनांची पुनरावृत्ती केली आहे. अर्जदार यांच्या विधिज्ञानी गैरअर्जदाराकडून अंतरिम पोटगी रक्कम रुपये १५,०००/- ची मागणी केली तर गैरअर्जदार यांच्या विधिज्ञानी अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

**०६.** अर्जदार ही गैरअर्जदारांकडून होणाऱ्या शारिरिक, मानसिक छळास कंटाळून माहेरी राहत आहे किंवा कसे ही बाब दोन्ही पक्षांचे पुरावे झाल्यानंतरच शाबीत होईल. प्रथमदर्शनी अर्जदार हीचे अर्जातील कथन व प्रतिज्ञापत्रातील मजकुर पाहिले असता, अर्जदारास शारिरिक, मानसिक छळ करुन तिच्यावर कौटुंबिक हिंसाचार झाल्याचे दिसुन येते. त्यामुळे अर्जदार ही अंतरिम पोटगी मिळण्यास पात्र आहे.

**०७.** गैरअर्जदारांच्या कथनानुसार, अर्जदार हिला उत्पन्नाचे स्वतंत्र साधन आहे. परंतु, त्याबाबत गैरअर्जदाराने कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. याउलट अर्जदाराने गैरअर्जदार क्र.१ व २ यांचे शेतीविषयक ७/१२ उताराची प्रत व गैरअर्जदार क्र.१ याचे पगारपत्रक याकामी अभिलेखावर दाखल केलेला आहे. त्यावरुन गैरअर्जदार क्र.१ यास दरमहा रक्कम रुपये ३०,०००/- इतका पगार मिळत असल्याचे दिसुन येते. गैरअर्जदार क्र.१ ने त्याच्या म्हणण्यामध्ये खाजगी कंपनीत नोकरी करत असल्याचे कथन करुन त्यास केवळ २०,०००/- मिळत असल्याचे कथन केले आहे. परंतु, गैरअर्जदार क्र.१ ने त्याबाबत त्याचे पगारपत्रक दाखल केलेले नाही. अर्जदाराने दाखल

केलेल्या पगारपत्रकानुसार गैरअर्जदार क्र.१ यास ३०,०००/– रुपये उत्पन्न मिळत होते. त्यामुळे गैरअर्जदार क्र.१ निश्चीतच पुणे येथे खाजगी कंपनीत ३०,०००/– अगर त्यापेक्षा जास्त उत्पन्न मिळत असल्याबाबात प्रथमदर्शनी निष्कर्ष काढता येईल. गैरअर्जदार क्र.१ ने त्याचेवर त्यांच्या आईवडीलांची जबाबदारी असल्याचे कथन केलेले आहे.

**०८.** गैरअर्जदार क्र.१ चे पगारातून मिळणारे उत्पन्न व त्याच्यावर असलेली आईवडीलांची जबाबदारी, अर्जदारास उदरनिर्वाहाकरीता लागणारा खर्च, धान्य व इतर जीवनावश्यक वस्तुंच्या किंमती, अर्जदार व गैरअर्जदार यांचे राहणीमान व चिखली पुणे येथील घरजागेच्या भाडयातून मिळणारे उत्पन्न यांचा विचार करता अर्जदार हिला दरमहा रूपये ४,०००/– (अक्षरी रूपये चार हजार फक्त) सदर आदेशाच्या दिनांकापासून अंतरिम पोटगी मंजुर करणे योग्य होईल. करीता मी खाली आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. अर्जदाराचा अंतरिम पोटगीचा अर्ज अंशतः मंजुर करण्यात येतो.

२. गैरअर्जदार क्र.१ याने अर्जदार हिला दरमहा रूपये ४,०००/– (अक्षरी रूपये चार हजार फक्त) सदर आदेशाच्या दिनांकापासून अंतरिम पोटगी द्यावी.

३. सदर आदेशाची प्रत ही दोन्ही पक्षकारांना विनामुल्य देण्यात यावी.

स्वाक्षरीत/–

दिनांक : २३.०२.२०२४

( **श्रीमती एस.जे. पाटील** )
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग
न्यायालय क्र.१, भूम.

## प्रमाणपत्र

असे प्रमाणित करणेत येते की, पी.डी.एफ. न्यायनिर्णय /आदेश यामधील सर्व मजकुर मुळ न्यायनिर्णय /आदेशातील मजकुराप्रमाणे तंतोतंत खरा व बरोबर आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नांव | : | एन. व्ही. कोळी,<br>लघुलेखक ग्रेड–३ |
| न्यायालयाचे नाव | : | न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, न्यायालय<br>क्र.१ भूम, ता. भूम. |
| आदेश दिनांक | : | २३.०२.२०२४ |
| आदेशावर स्वाक्षरी केलेचा दिनांक | : | २३.०२.२०२४ |
| आदेश अपलोड केलेचा दिनांक | : | २६.०२.२०२४ |